**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील न्यायमुर्ती यांच्या शासकीय निवासस्थान परिसरातील उद्यानांच्या देखभाल, दुरूस्तीची कामे बाह्ययंत्रणेव्दारे निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त सेवापुरवठादाराकडून करण्याकरिता माळी व मजूर पदांच्या काल्पनिक पदनिर्मितीस मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एचसीटी ५२२२/५२२/प्र.क्र.७३/का.४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २२ ऑक्टोबर, २०२६.

<u>संदर्भ -</u>

१. प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांची दि.१५/०४/२०२६, दि.०२/०६/२०२६ रोजीची पत्रे.
२. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दि.२७/०१/२०१५.
३. शासन निर्णय, वित्त विभाग, दि.२७/०४/२०२२.

<u>प्रस्तावना -</u>

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील न्यायमुर्ती यांच्या शासकीय निवासस्थान परिसरातील उद्यानांच्या देखभाल, दुरूस्तीची कामे बाह्ययंत्रणेव्दारे निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त सेवापुरवठादाराकडून करण्याकरिता माळी व मजूर पदांच्या काल्पनिक पदनिर्मितीस मान्यता देण्याचा प्रस्ताव नागपूर खंडपीठ प्रशासनाने संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रांन्वये शासनास सादर केला होता. त्यानुसार सदरहू प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. उक्त प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथील न्यायमुर्ती यांच्या शासकीय निवासस्थान परिसरातील उद्यानांच्या देखभाल, दुरूस्तीची कामे बाह्ययंत्रणेव्दारे निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्त सेवापुरवठादाराकडून करण्याकरिता दोन वर्ष कालावधीकरिता करून घेण्यासाठी १८ माळी २४.५ मजूर यांच्या मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेव्दारे घेण्यास याअन्वये मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर संवर्गाच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे घेताना संदर्भाधीन शासन निर्णय, वित्त विभाग, दि. २७/०४/२०२२ अन्वये विहित मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. त्याअन्वये शासन खर्चात किमान २० ते ३० टक्के इतकी बचत होणे आवश्यक राहील.

३.	सदर मंजुरीस अनुसरून, शासनाच्या विहीत नियम/कार्यपध्दतीचा अवलंब करून, उक्त कामाकरिता नवीन सेवापुरवठादारची निवड करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. त्यासाठीच्या निविदा सूचनेत सदर पदसंख्येचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. बाह्ययंत्रणेव्दारे घेण्यात येणाऱ्या सदर मनुष्यबळाच्या सेवांचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.

४.	सदर मंजुरीच्या अनुषंगाने, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Norms प्रमाणे उद्यानांची देखभाल/दुरूस्ती, खत, कीटकनाशके, रोपे, माती, अवजारे व आवश्यक मनुष्यबळ यांचा पुरवठा पुरवठादारामार्फत करण्यात यावा.

५.	ई-निविदा प्रक्रियेअंती पात्र निम्नतम सेवापुरवठादाराच्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेऊन, विधि व न्याय विभागाच्या संदर्भाधीन दि.२७/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत कागदपत्रांसह शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.

६.	सदर शासन निर्णय उपसमितीने दि.२२/०९/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२२१६२०११४५१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VILAS V GAIKWAD

Digitally signed by VILAS V GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=64F5AB9E019C90AD5DB684984DF113ED09062245CB9E042BE5B12E5AA482FC17, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CD7BB8BAA2D72280DD453A12422482D4768A126C83ECB44E84A8186EED4352A0, cn=VILAS V GAIKWAD
Date: 2026.10.22 16:21:11 +05'30'

**(विलास वसंत गायकवाड)**
**विधि सल्लागार-नि-सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. महाप्रबंधक,उच्च न्यायालय ,मुंबई,
२. प्रबंधक (वित्त व अर्थसंकल्प) , अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
३. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर,
४. महालेखापाल (लेखापरीक्षा व लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-दोन, नागपूर.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
६. वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क. कक्ष, मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी, का.२३/२४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती (कार्या.४)